# महाराष्ट्र विधानसभा
## दुसरे अधिवेशन, २०२३

-------------------------------------

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**सोमवार, दिनांक २४ जुलै, २०२३ / श्रावण २, १९४५ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) वैद्यकीय शिक्षण मंत्री**<br>**(२) ग्रामविकास व पंचायत राज,पर्यटन मंत्री**<br>**(३) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री**<br>**(४) कामगार मंत्री**<br>**(५) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री**<br>**(६) महिला व बालविकास मंत्री**<br>**(७) क्रीडा व युवक कल्याण मंत्री**<br>**(८) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

-------------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २३**

-------------------------------------

### धाराशिव जिल्हयात बांधकाम कामगारांच्या मध्यान्ह भोजन योजनेत झालेला आर्थिक गैरव्यवहार

**(१) * ६७९८७ श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशिव जिल्हयात बांधकाम कामगारांच्या मध्यान्ह भोजन योजनेत सुमारे २८,००० कामगारांच्या संशयास्पद नोंदी करुन कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे जिल्हाधिकारी यांनी नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालातून माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशी अहवालातील शिफारशींनुसार दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे खरे नाही.

धाराशिव जिल्ह्यातील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतणीकरण व लाभ वाटप इत्यादी व मध्यान्ह भोजन योजनेमधील भ्रष्टाचाराची सविस्तर चौकशी करणेबाबत जिल्हाधिकारी, धाराशिव यांचेकडे प्राप्त तक्रारीचे अनुषंगाने जिल्हाधिकारी, धाराशिव यांनी अपर जिल्हाधिकारी, धाराशिव यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत केली होती. त्यानुसार चौकशी समितीचा अहवाल जिल्हाधिकारी, धाराशिव यांनी शासनास सादर केला आहे.

धाराशिव जिल्हयासाठी मध्यान्ह भोजन पुरवठा करण्याकरीता नियुक्त संस्थेने सर्वेक्षणाअंती निवड केलेल्या बांधकामाच्या ठिकाणावरील नोंदीत व अनोंदीत कामगारांना मध्यान्ह भोजन पुरवठयाबाबत संबंधित विकासक/ठेकेदार/आस्थापनाचे सहमती पत्र प्राप्त करुन जिल्हा कार्यालयास सादर केलेल्या कामगारांच्या यादीस मंजूरी देण्यात येते. अनोंदीत बांधकाम कामगारांना नोंदीत करण्याबाबत नियुक्त संस्थेस मंडळामार्फत वेळोवेळी सुचना देण्यात आलेल्या आहेत. मध्यान्ह भोजनाचा लाभ घेत असलेले २७,३०१ एवढे कामगार जिल्ह्यातील विविध बांधकाम साईट / विट भट्टी / स्टोन क्रशर/ कामगार नाके / मनरेगा कामे इत्यादी ठिकाणी काम करीत आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बांदिवडे ब्रुद्रुक (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) या ग्रामपंचायती मधील ग्रामसेवकाने केलेला अपहार**

**(२) * ६६०२५ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांदिवडे ब्रुद्रुक (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील ग्रामसेवक श्री.हेमंत बलराम तांबे यांनी ग्रामपंचायत बांदिवडे खुर्द, कोईळ या दोन ग्रामपंचायतीत एकूण रक्कम रु ३०,५९,१७६/- चा अपहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी ग्रामसेवकाचे निलंबन व खातेनिहाय चौकशी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,सिंधुदुर्ग यांच्याकडे प्रस्तावित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन ग्रामपंचायतीत मागील पाच वर्षात यापेक्षाही जास्त रकमेचा अपहार झाला असल्याने सन २०१७ ते माहे डिसेंबर, २०२२ या कालावधीची पुनर्लेखा तपासणी करण्याबाबत ग्रामस्थ श्री.चंद्रकात परब यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १४ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.

बांदिवडे बुद्रुक या ग्रामपंचायतीचे तत्कालिन ग्रामसेवक श्री.हेमंत बलराम तांबे यांनी सन २०२०-२१ व २०२१-२२ या वर्षात एकूण रु.१९,२३,००७/- व ग्रामपंचायत बांदिवडे खुर्द कोहळे या ठिकाणी सन २०१८-१९ व सन २०१९-२० या वर्षात रु.११,३६,१६९/- असा एकूण रु.३०,५९,१७६/- एवढा आर्थिक अपहार केला असल्याचे तपासणीत व चौकशीत आढळून आले आहे.

(२) हे खरे आहे.

अपहार निदर्शनास आल्यानंतर संबंधित ग्रामसेवकास निलंबित केले होते. सद्यस्थितीत सदर ग्रामसेवकास पुनर्स्थापित केले असून त्यांच्यावर खातेनिहाय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) संबंधित ग्रामसेवकाविरुध्द विभागीय चौकशी सुरु असून चौकशी अहवालाच्या शिफारशीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## मुंबई मधील सर जे. जे. रुग्णालयातील अध्यापकांनी सामुहिक राजीनामे दिल्याबाबत

**(३) * ६५०१४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सर जे.जे.रुग्णालयातील नेत्र शल्यचिकित्साशास्त्र विभागप्रमुख आणि प्राध्यापकासह आठ अध्यापकांच्या विरोधात निवासी डॉक्टरांनी केलेल्या तक्रारीमुळे विभाग प्रमुख व प्राध्यापकासह आठ अध्यापकांनी सामुहिक राजीनामे दिनांक ४ जुन, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या काही दिवसापासून निवासी डॉक्टर विरुध्द नेत्र शल्यचिकित्साशास्त्र विभागप्रमुख आणि माजी विभागप्रमुख यांचेमध्ये संघर्ष सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, ज्येष्ठ नेत्ररोगतज्ञ डॉ.तात्याराव लहाने हे या रुग्णालयात कंत्राटी पद्धतीवर नियुक्त असून त्यांनी माहे ऑगस्ट ते माहे डिसेंबर, २०२२ या कालावधीत कोणत्याही पदावर नसताना त्यांनी विनापरवानगी सुमारे ६९८ शस्त्रक्रिया केल्याचे रुग्णालयाच्या त्रिसदस्यीय समितीने दिनांक १६ जून,२०२३ रोजी वा त्यासुमारास शासनास सादर केलेल्या अहवालात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सर जे.जे.रुग्णालयातील डॉक्टरांच्या राजीनामा प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपुर्ण प्रकरणाची शासनाने उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

९ डॉक्टरांनी वैयक्तीक कारणास्तव राजीनामे शासनास सादर केले आहेत.

(२) हे खरे नाही.

(३ ) हे खरे आहे.

(४) हे खरे आहे.

(५) याबाबत वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांच्याकडून अहवाल मागविण्यात आला आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(६) लागू नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हयातील अंगणवाडी केंद्रांना कायमस्वरुपी इमारती उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४) * ६८३५२ श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी, दुर्गम, नक्षलग्रस्त गडचिरोली जिल्हयात १७०० अंगणवाडी केंद्र कार्यरत असून या भागातील जवळपास ४०० अंगणवाडी केंद्राना स्वत:च्या इमारती नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इमारतीअभावी परिसरातील बालके, गरोदर महिला व स्तनदा मातांसह अंगणवाडी कर्मचाऱ्यांना अनेक गैरसोईंचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू अंगणवाडयांना कायमस्वरुपी इमारती उपलब्ध करुन देणेसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती आदिती तटकरे :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

गडचिरोली जिल्ह्यात एकूण १२ प्रकल्पांतर्गत १६४० मुख्य अंगणवाडया आहेत. या १६४० अंगणवाडयांनापैकी १५२३ अंगणवाडयांना स्वतःची इमारत आहे. उर्वरित ११७ अंगणवाडी केंद्रांना स्वतःची इमारत नाही. तसेच, स्वत:च्या इमारतीमधील अंगणवाडयांनापैकी ९८ अंगणवाडयांच्या इमारती जीर्ण झालेल्या आहेत. तसेच गडचिरोली जिल्ह्यात ५१८ मिनी अंगणवाडया असून त्यापैकी ४३ मिनी अंगणवाडयांना स्वत:ची इमारत आहे. उर्वरित ४७५ मिनी अंगणवाड्यांना स्वत:ची इमारत नाही.

महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दिनांक ३१ जानेवारी, २०२२ अन्वये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत महिला व बाल विकास सशक्तीकरण योजनेसाठी किमान ३ % इतका निधी कायम स्वरुपी उपलब्ध करणेबाबत मान्यता देण्यात आली आहे. त्यामध्ये अंगणवाडी बांधकामाचे प्रावधान आहे.

त्यानुसार ११७ इमारत नसलेल्या व ९८ जीर्ण झालेल्या अशा एकूण २१५ अंगणवाडयापैकी १३६ अंगणवाडी इमारत बांधकाम सन २०२१-२२ व २०२२-२३ या वर्षामध्ये जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत मंजूर असून कामे सुरु आहेत. तसेच उर्वरित ७९ इमारतींची कामे जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत टप्प्या टप्प्याने करण्यात येणार आहेत.

तसेच स्वतःची इमारत नसलेल्या ४७५ मिनी अंगणवाडी केंद्रांना नवीन इमारतींची बांधकामे करण्याकरिता आदिवासी उपयोजना अंतर्गत निधी उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव आदिवासी विभागास जिल्हा स्तरावरून सादर करण्यात आला आहे. निधी उपलब्ध झाल्यावर अंगणवाडी केंद्रांची बांधकामे करण्यात येणार आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात दुष्काळी व कमी पर्जन्यमान होणाऱ्या जिल्ह्यात भरडधान्य लागवडीसाठी शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत

**(५) * ६७६८४ श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संयुक्त राष्ट्र संघाने सन २०२३ हे मिलेट्स वर्ष घोषित केल्यामुळे राज्यात भरड धान्यावर आधारित व्यावसायिक निर्मिती वाढविण्यासाठी उमेद अभियान आणि हैदराबाद येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मिलेट्स रिसर्च (आयआयएमआर) यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील नऊ जिल्ह्यातील १२७७५ एकर क्षेत्रावर विविध भरडधान्य लागवडीसाठी उद्दिष्ट निश्चित केले असून यामध्ये सोलापूर, पालघर व नंदुरबार जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांचे काम या कराराच्या माध्यमातून होणार असल्याचे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उमेदच्या माध्यमातून या नऊ जिल्ह्यात भरड धान्य लागवड करीत असतानाच सोलापूर, सांगली, पुणे, अहमदनगर, जळगाव, धाराशिव, लातूर, बीड, जालना व नांदेड या जिल्ह्यासह दुष्काळी व कमी पर्जन्यमान होणाऱ्या जिल्ह्यात भरडधान्य लागवडीसाठी शेतकऱ्यांना शासन अनुदान तसेच महिला शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन करुन त्यांना प्रशिक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, भरड धान्याचे पौष्टिक पदार्थ लहान मुले व वृद्धांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.

उमेद अभियान आणि हैद्राबाद येथील इंडियन इंस्टिट्यूट ऑफ मिलेट्स रिसर्च (IIMR) यांच्यामध्ये IIMR मार्फत तयार करण्यात आलेल्या भरडधान्य प्रक्रियायुक्त पदार्थांच्या आधुनिक तंत्रज्ञान आणि प्रशिक्षण याकरिता ३६ महिन्यांसाठी करार करण्यात आला आहे.
(२) अंशत: खरे आहे.

राज्यातील नऊ जिल्ह्यामध्ये १२७७५ एकर क्षेत्रावर विविध भरडधान्य लागवडीसाठी महिला शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या मदतीने प्रोत्साहित करण्यात येत आहे. या करारान्वये सध्या कार्यरत असलेल्या सोलापूर, पालघर आणि नंदुरबार जिल्ह्यातील शेतकरी उत्पादक कंपन्यांतर्गत भरडधान्य प्रक्रियायुक्त पदार्थ तयार करून त्या पदार्थांचा व्यवसाय करण्यासाठी महिलांना प्रशिक्षण देण्याचे नियोजित आहे.
(३) उमेद अभियानांतर्गत नऊ जिल्ह्यामध्ये विविध भरडधान्य लागवडीसाठी महिला शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या मदतीने प्रोत्साहित करण्यात येते. अनुदान देण्यात येत नाही. तसेच यामध्ये नव्याने शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करण्यात येत नाही. मात्र अस्तित्वातील शेतकरी उत्पादक कंपनी मधील महिलांना IIMR मार्फत प्रशिक्षण देऊन भरडधान्य आधारित व्यवसाय / उद्योग करण्यास सहकार्य केले जाते.
(४) व (५) महिला व बाल विकास विभागामार्फत ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना पुरविण्यात येणाऱ्या गरम ताजा आहारामध्ये आठवडयातून एकदा मिलेट बेस्ड पाककृतीचा समावेश करण्याबाबत सूचना देण्यात आल्या असून शालेय शिक्षण विभागार्फत राज्य व केंद्र शासनाच्या शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित या शाळांमधील विद्यार्थ्यांना आठवडयातील एक दिवसासाठी तृणधान्ययुक्त पौष्टिक आहार देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औंध (जि.पुणे) येथील जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्याच्या निष्काळजीपणामुळे नवजात बालकाचा झालेला मृत्यू

**(६) * ६६२५२ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपळे गुरव (जि.पुणे) येथील श्रीमती दिप्ती विरनळ या गर्भवती महिलेच्या अचानक पोटात दूखू लागल्याने तीला दिनांक २३ फेब्रुवारी,२०२३ रोजी वा त्या सुमारास औंध (जि.पुणे) येथील जिल्हा रुग्णालयात आणले असता तेथील वैद्यकीय अधिकाऱ्याच्या निष्काळजीपणामुळे नवजात बालकाचा मृत्यू झाला असल्याचे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्याने गर्भवती महिलेची तपासणी करतेवेळी केलेल्या दुर्लक्षामुळे सदर महिलेची प्रकृती गंभीर झाली असल्याने तीला ससून रुग्णालयात (जि.पुणे) पाठविले असता रस्त्यातच प्रसूती झाल्याने नवजात बालकाचा मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** ( १) व (२) हे अंशत: खरे आहे.

सदर महिला २६ आठवडयाची गरोदर (कमी दिवसाची) असल्याने प्रसुती पश्चात तात्काळ बाळाला व्हेन्टीलेटर आवश्यक असल्याने सदर रुग्णास ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथे १०८ सुविधेसह संदर्भित करण्यात आले होते. तथापि सदर रुग्ण हा ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथे न जाता पुणे महानगरपालिकेच्या औंध कुटीर व प्रसुती रुग्णालयात गेला. तेथील रुग्णवाहिकेमधून तात्काळ ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथे पोहचल्यावर तिचा गर्भपात होवून मृत बाळ जन्मले.
(३) सदर प्रकरणात चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालानुसार संबंधित कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची सेवा समाप्त करण्यात आली आहे. तसेच संबंधित अधिपरिचारीका यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर शहरातील छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालयात (सीपीआर ) स्वतंत्र कॅन्सर कक्ष स्थापन करणेबाबत

**(७) * ६८०७२ श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर येथे सुमारे ६६५ खाटांचे छत्रपती प्रमिलाराजे सर्वोपचार रुग्णालय असून येथे आजूबाजूच्या जिल्ह्यातून मोठया प्रमाणात रुग्ण उपचारासाठी येत असून तेथे कर्करोग उपचारासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्य:स्थितीत कॅन्सरग्रस्त रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता कोल्हापूर येथे स्वतंत्र कॅन्सर रुग्णालय उभारण्याची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त रुग्णालयात स्वतंत्र कॅन्सर कक्ष तातडीने स्थापन करणेबाबत तसेच जिल्ह्यात स्वतंत्र कॅन्सर रुग्णालय उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय.
(२) होय.
(३) सद्यस्थितीत रुग्णालयात उपचारार्थ येणा-या कॅन्सर रुग्णांवर प्राथमिक शस्त्रक्रिया उपलब्ध असलेल्या वैद्यकीय तज्ञांकडून करण्यात येतात. तथापि, रुग्णालयात ONCO SURGEON उपलब्ध नाही. ONCO SURGEON उपलब्ध झाल्यानंतर रुग्णालयात स्वतंत्र कॅन्सर कक्ष सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## म्हसळा ( जि. रायगड ) तालुक्यातील चार गावात दुषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(८) * ६६९०१ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

( १) म्हसळा (जि. रायगड) तालुक्यातील मेंदडी , तुरुंबाडी, वारळ, काळसुरी या चार गावातील सुमारे साडेपाच हजाराहून अधिक नागरिकांना मेंदडी पाझर तलावाच्या शेजारच्या विहिरीतून दुर्गंधीयुक्त पाणीपुरवठा करण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तलावातील पाणीसाठा कमी झाल्याने पाण्यातील जलपर्णी वनस्पती आणि चिखलामुळे ग्रामस्थांना दुषित पाणी पुरवठा होत असून त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या परिसरातील वारळ व तुरुंबाडी या गावात सन २०१२ च्या दरम्यान मोठया प्रमाणावर गॅस्ट्रोची लागण झाली होती तशीच परिस्थिती पुन्हा येण्याची भीती असल्यामुळे ग्रामस्थांनी शुद्ध व प्रदूषणविरहीत पाणीपुरवठा करण्यासाठी तहसीलदार, म्हसळा व गटविकास अधिकारी, पंचायत समिती, म्हसळा, ग्रामीण पाणीपुरवठा आदींकडे सातत्याने लेखी निवेदनाद्वारे मागणी करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सदर गावांना शुध्द व नियमित पाणीपुरवठा करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

मेंदडी, काळसुरी, वारळ व तुरुंबाडी या गावांना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेतंर्गत मेंदडी येथील पाझर तलावातून पाणी पुरवठा करण्यात येत आहे. पाझर तलावातून दुर्गंधीयुक्त पाणी पुरवठा होत असल्याबाबतची तक्रार प्राप्त झाल्यानंतर तहसिलदार, म्हसळा व गट विकास अधिकारी, पंचायत समिती, म्हसळा यांनी दिनांक १८/४/२०२३ रोजी प्रत्यक्ष पहाणी केली असता, पाझर तलावातील पाण्याचा साठा दरवर्षी पेक्षा कमी झालेला तसेच, पाण्यामध्ये पिवळसर रंगाचे गढुळ जलपर्णी वनस्पतीयुक्त आढळून आले आहे. सदरची बाब विचारात घेता, पाणी गाळून, उकळून तसेच पाण्यामध्ये योग्य प्रमाणात T.C.L. पावडर वापरुन पाणी वापरण्याबाबत संबंधित ग्रामपंचायतींना कळविण्यात आले होते. मेंदडी पाझर तलावातील पाण्याची जैविक व रासायनिक तपासणी भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेअंतर्गत उपविभागीय प्रयोगशाळा, माणगांव येथे केली असता, सदरचे पाणी पिण्यास योग्य असल्याचे आढळून आले आहे.

(४) दिनांक ०९ जून,२०२३ नंतर दोन दिवसांच्या कालावधीत जलसंधारण विभाग, माणगांव यांच्यामार्फत पाझर तलावातील अंदाजे ५०० घन.मी.गाळ काढण्यात आला आहे. तसेच जलसंधारण विभाग व उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा यांनी संयुक्त पहाणी करुन, पाझर तलावाच्या परिसरात योग्य त्या ठिकाणी संरक्षण भिंत व उद्भव विहिरीच्या ठिकाणी संरक्षण जाळी तसेच पाझर तलावाचा गाळ काढणे यासाठी रु.४.९९ कोटींचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## ओसरवीरा (ता. डहाणू जि. पालघर) येथील गर्भवती महिलेचा प्रसूतीदरम्यान बाळासह झालेला मृत्यू

**(९) * ६७११३ श्री.श्रीनिवास वनगा (पालघर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) ओसरवीरा (ता. डहाणू जि. पालघर) येथील कासा उपजिल्हा रुग्णालयात पुरेशा सुविधेअभावी आणि डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे आठ महिन्याच्या गर्भवती महिला श्रीमती सोनाली वाघात यांना प्रसूतीसाठी अन्य रुग्णालयात नेताना गर्भवती महिला व बाळाचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी तिचे पती श्री.राजू वाघात यांनी कासा पोलिस ठाण्यात केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत : (**१) हे अंशत: खरे आहे.

गर्भवती माता श्रीमती सोनाली वाघात ही उपजिल्हा रुग्णालय, कासा येथे दिनांक १२/०५/२०२३ रोजी ताप, पायदुखी व थकवा इत्यादी कारणासाठी दाखल झाली होती. कर्तव्यावर असलेले वैद्यकीय अधिकारी व अधिपरिचारिका यांनी विचारपूस व तपासणी करून वेळीच औषध उपचार चालू केला. परंतु सदर अत्यावस्थ गरोदर मातेस पुढील विशेष उपचाराची आवश्यकता असल्याने तीस वेदांता हॉस्पिटल, धुंदलवाडी येथे संदर्भित करण्यात आले असता त्या ठिकाणी सदर मातेस मृत घोषित केले.

(२) हे खरे नाही.

याबाबत रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द सदोष मनुष्यावधचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केलेली नाही.

(३) सदर प्रकरणी जिल्हास्तरीय समितीने व राज्यस्तरीय चौकशी समितीने चौकशी केली आहे. चौकशीमध्ये सदर मातेवर प्राथमिक आरोग्य केंद्र, तवा येथे रक्ताक्षयाचे उपचार चालू होते. रक्तातील हीमोग्लोबिनचे प्रमाण कमी असल्याचे आढळून आले आहे. कर्तव्यावर असलेले कंत्राटी वैदयकीय अधिकारी डॉ. विशाल सिंग यांनी रुग्णाच्या तपासणी व उपचाराबाबत रुग्णसेवा नियमांचा व मार्गदर्शक सुचनांचा अवलंब न केल्यामुळे कर्तव्यात कसुर केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांची सेवा दि. ५/७/२०२३ च्या आदेशान्वये समाप्त करण्यात आलेली आहे. श्रीमती हर्षिला थुलार, अधिपरिचारीका यांनी कार्यालय सोडताना कार्यालय प्रमुखास पुर्वकल्पना न दिल्याबाबत तसेच रुग्णाची माहिती कर्तव्यार्थ आलेल्या कर्मचाऱ्यास न दिल्यामुळे त्यांची ग्रामीण रुग्णालय विक्रमगड येथे बदली करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात थॅलेसिमिया आजाराच्या जनजागृतीकरीता करावयाची उपाययोजना

**(१०) * ६७५९७ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात थॅलेसिमियाचे ११,००० रुग्ण असून थॅलेसिमियाग्रस्त बालकाला प्रत्येक वीस दिवसांनी रक्त द्यावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आई-वडिलांकडून मुले थॅलेसिमिया वाहक किंवा बाधित होऊ शकत असल्याने याकरिता गरोदर महिलांना स्त्री रोग तज्ञांनी थॅलेसिमियाची तपासणी गरजेची केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य रक्त परिषद सहसंचालक यांनी थॅलेसिमियाची जनजागृती आणि तपासणी व्हावी यासाठी समृध्दी फाऊंडेशनची स्थापना केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात थॅलेसिमियाग्रस्त रुग्णांसाठी रक्त, औषध पुरवठा,योग्य उपचार, गरोदर महिलांची थॅलेसिमिया तपासणी तसेच जनजागृती यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत : (**१) होय, हे अंशत: खरे आहे.

राज्य रक्त संक्रमण परिषदेद्वारे थॅलेसिमियाग्रस्त थॅलेसिमिया कार्ड देण्यात येते व सद्यस्थितीत असे एकूण ११५५३ कार्ड वितरीत करण्यात आले आहेत.

थॅलेसिमियाग्रस्तास आवश्यकतेनुसार १५ ते २० दिवसांनी रक्त संक्रमण करावे लागते.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

थॅलेसिमिया निश्चित निदानासाठी HPLC (High Performance Liquid Chromatography) तपासणी करण्यात येते व ही तपासणी HLL या बाह्य स्त्रोताच्या प्रयोगशाळेमार्फत मोफत उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) १. सर्व शासकीय व खाजगी रक्तपेढयांमार्फत या रुग्णांसाठी मोफत रक्तपुरवठा करण्यासाठीचा शासन निर्णय दि.८ फेब्रुवारी,२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

२. या रुग्णांना वारंवार रक्त संक्रमण केल्यामुळे रक्तातील वाढलेले लोह कमी करण्यासाठी (Iron Chelation) च्या गोळ्या मोफत देण्यात येतात.

३. थॅलेसिमिया संशयित गरोदर मातांची HPLC तपासणी करण्यात येते.

४. थॅलेसिमिया व सिकलसेल या दोन्ही अनुवंशिक आजाराबाबत शाळा व महाविद्यालयात या आजाराच्या प्रसाराबाबत व विवाहपुर्व थॅलेसिमिया /सिकलसेल चाचणी करण्याबाबत समुपदेशन करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील (इर्विन) दुरवस्थेबाबत

**(११) * ६६९१६ ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाची (इर्विन) सद्य:स्थितीत अत्यंत दुरवस्था झाल्याचे माहे एप्रिल,२०२३ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील रुग्णालयात जुनी यंत्रसामुग्री, मनुष्यबळाचा तसेच डॉक्टर, तज्ञांचा अभाव, नविन अत्याधुनिक एक्स-रे मशीन विनावापर पडून असणे इ. अनेक कारणांमुळे रुग्णांना उपचार घेण्यास गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन इर्विन रुग्णालयातील दुरवस्था दूर करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) माहे मे, २०२३ पासून जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे अत्याधुनिक डिआर एक्सरे मशिन कार्यरत असून रुग्णांच्या अविरत सेवेत आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील जलजीवन मिशनअंतर्गत योजनेची कामे पूर्ण करणेबाबत

**(१२) * ६६३१४ श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यात जलजीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा योजनांची कामे जलदगतीने पूर्ण करण्यासाठी तसेच दर्जा व गुणवत्ता तपासणी करण्याचे काम टीयुव्ही, एसयुडी साऊथ एशिया या त्रयस्थ एजन्सींना देण्यात आले असून सदरहू एजन्सीकडून त्यांच्या कामात हलगर्जीपणा होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, पुरंदर (जि.पुणे) तालुक्यातील घोरवडी धरणावरुन सुपे खुर्द, पिंपळे, पोमणनगरसाठी सुरु असलेल्या जलजीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा योजनांचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुरंदर येथील कामे निकृष्ट दर्जाची होऊनही ठेकेदारास कामाचे देयक अदा करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अपूर्ण कामे सत्वर पुर्ण करणेबाबत तसेच संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि. ठाणे) येथील शासकीय निरीक्षण आणि बालगृहातील अल्पवयीन मुलांचे लैंगिक छळ होत असल्याबाबत

**(१३) * ६५२९९ श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) काचेरीपाडा (ता.भिवंडी, जि. ठाणे) येथील शासकीय निरीक्षण आणि बालगृहात पुनर्वसनासाठी वास्तवाला

असलेल्या अल्पवयीन मुलांचे तेथील शिक्षिका लैंगिक छळ करीत असल्याचे माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बालगृह एका अनुदानित संस्थेला करार तत्वावर चालविण्यास देण्यात आले असून सदर संस्थेमार्फत पात्रता नसतानाही शिक्षिकेची नेमणूक करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्या विहित अटी शर्तीनुसार संस्थेस काम देण्यात आले होते, त्याचे देखील उल्लंघन झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर शिक्षिकेविरूद्ध शांतीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित संस्था व दोषी शिक्षिकेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती आदिती तटकरे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सदर संस्था ही जिल्हा परिविक्षा आणि अनुरक्षण संघटना यांच्यामार्फत कार्यरत आहे. सदर संघटनेचे अध्यक्ष हे ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी असून त्यांच्यामार्फत संस्थेवरील कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात येतात.

(३) हे खरे नाही.

संस्थेकडून कोणत्याही अटी व शर्थींचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) होय, हे खरे आहे.

संबंधित शिक्षिकेविरुध्द भा.दं.सं.१८६० अंतर्गत कलम ३७६(२) (जे) तसेच, बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम १२ अन्वये दिनांक २१.०३.२०२३ रोजी शांतीनगर, पोलीस स्टेशन, भिवंडी, जि. ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(५) अध्यक्ष, बाल कल्याण समिती,ठाणे आणि अधिक्षक, शासकीय मुलांचे बालगृह ( वरिष्ठ ), उल्हासनगर, जि.ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीमार्फत सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली. महाराष्ट्र राज्य परिविक्षा आणि अनुरक्षण संघटना कर्मचारी नियमावली १९९५ मधील नियम क्र.१८ ते २३ नियमांचे उल्लंघन केल्याने संबंधित शिक्षिकेला दिनांक ०४ जानेवारी, २०२३ पासून सेवेतून निलंबित करण्यात आलेले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्ह्यात निर्माण झालेली पाणी टंचाई

**(१४) * ६६७६५ श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यातील ८५ गावांसह अन्य गावांतही पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील ८५ गावांनी अधिग्रहणासाठी प्रस्ताव दाखल केल्यानंतर त्याची तपासणी होऊन ते तहसिलदार कार्यालयाकडे सादर करण्यात आल्याचे दिनांक २९ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त ८५ गावांना (६२ गावे व २३ वाडयांसह) सुरळीतपणे व नियमितरित्या पाणी पुरवठा होण्याचे दृष्टीने जिल्हा प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१), (२), (३) व (४) होय,

लातूर जिल्हयातील ग्रामपंचायतींकडून ८५ गावे व ३६ वाडयांकरिता १३१ विहिर अधिग्रहण प्रस्ताव स्थानिक प्रशासनांकडे प्राप्त झाले होते. त्यापैकी ९० अधिग्रहण प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली असून सदर ठिकाणी सुरळीत व नियमित पाणी पुरवठा करण्यात येत आहे. उर्वरित ४१ विहिर अधिग्रहण प्रस्तावांना मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## निजामपूर (ता. साक्री, जि.धुळे) चिखलीपाडा येथील मेणबत्ती तयार करण्याऱ्या कारखान्याला लागलेल्या आगीत चार महिला कामगारांचा झालेला मृत्यू

**(१५) * ६४८५० श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निजामपूर (ता. साक्री, जि.धुळे) गावाजवळील चिखलीपाडा येथे मेणबत्ती तयार करण्याच्या कारखान्यात झालेल्या भीषण स्फोटात ४ महिला कामगारांचा मृत्यू व दोन महिला व अन्य कामगार गंभीर जखमी झाल्याचे दिनांक १८ एप्रिल,२०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर दुर्घटनेस जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदर स्फोटात जखमी व मृत कामगारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) भवानी सेलेब्रेशन्स् , गट नंबर - १६५, मु.पो.वासखेडी, ता.साक्री, जि.धुळे या कारखान्यात दि.१८.०४.२०२३ रोजी आग लागली असून, सदर आगीच्या दुर्घटनेत ५ महिला कामगारांचा मृत्यू झाला असून, १ महिला कामगार जखमी झालेली आहे.

(२) सदर कारखान्यातील आगीच्या दुर्घटनेची दि.१९.०४.२०२३ रोजी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून चौकशी करण्यात आली आहे. चौकशीदरम्यान घटनेच्या दिवशी कारखान्यातील Mixing & Filling Shed मध्ये स्पार्कल कँडलमध्ये कच्चा मालाचे मिश्रण असलेली पावडर (नायट्रोसेल्युलोज, पोटॅशिअम क्लोराईड, आयर्न पावडर) भरत असतांना अचानक आग लागली. त्याठिकाणी ठेवलेल्या कच्च्या मालाच्या मिश्रणामुळे आग अधिकच पसरली गेल्याने सदर दुर्घटना घडली असल्याचे निदर्शनास आले.

तसेच, चौकशीमध्ये महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ मधील नियमांचा भंग तसेच, कारखाना विना परवाना सुरु असल्याचे आढळून आल्याने कारखान्याच्या भोगवटादाराविरुद्ध प्रथम न्यायदंडाधिकारी, साक्री यांच्या न्यायालयात दि.०५.०७.२०२३ रोजी खटला क्र.००००३७२/२०२३ दाखल करण्यात आला आहे.

उपरोक्त चौकशीव्यतिरिक्त, कारखान्यातील अपघात प्रकरणी क्षेत्रिय सरकारी कामगार अधिकारी यांनी दि.१९.०४.२०२३ रोजी प्रत्यक्ष भेट देऊन किमान वेतन अधिनियम,१९४८ व वेतन प्रदान अधिनियम,१९३६ अंतर्गत आढळून आलेल्या त्रूटींच्या अनुषंगाने कारखाना मालकाविरुद्ध प्रथम न्यायदंडाधिकारी, साक्री यांचे न्यायालयात खटला क्र.S.C.C.३३८/२०२३ व खटला क्र.S.C.C.३४०/२०२३ असे दोन खटले दाखल करण्यात आले आहेत.

सदर दुर्घटनेप्रकरणी पोलीस स्टेशन निजामपुर,ता.साक्री येथे कारखान्याचे भागीदार, जागेचे मालक व कारखान्यातील एका कामगाराविरुद्ध फौजदारी गुन्हा क्र.००७३/२३ दाखल करण्यात आला असून, सदर चारही आरोपींना पोलीसांनी अटक केलेली आहे. याशिवाय, सदर दुर्घटनेनंतर कारखान्याच्या दोन्ही भागीदारांना पोलिसांनी अटक केली असून, कारखान्यातील उत्पादन प्रक्रिया सद्यस्थितीत बंद आहे.

(३) सदर दुर्घटनेतील ५ मृत कामगारांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीमधून प्रत्येकी रु.१.०० लाख याप्रमाणे एकूण ५ लाख इतकी आर्थिक मदत जिल्हाधिकारी, धुळे यांचेमार्फत दि.०५.०७.२०२३ रोजी धनादेशाद्वारे अदा केली आहे.

तसेच, सरकारी कामगार अधिकारी, धुळे यांनी दि.२४.०४.२०२३ रोजीच्या पत्रांन्वये सदर दुर्घटनेतील मृत कामगारांच्या वारसांना कामगार नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ अंतर्गत नुकसान भरपाई मिळण्यासाठी कामगार न्यायालय तथा आयुक्त कामगार नुकसान भरपाई, धुळे यांना माहिती सादर केली आहे. त्यानुसार, कामगार न्यायालय, धुळे यांचेमार्फत संबंधित आस्थापना मालकांना दि.०५.०७.२०२३ नुसार नोटीस काढण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हटकरवाडी (ता.मानवत, जि.परभणी) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील वर्गखोल्यांची दुरुस्ती करणेबाबत

**(१६) * ६६८२१ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हटकरवाडी (ता.मानवत, जि.परभणी) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील वर्गखोल्यांचे पत्रे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या वादळी वाऱ्यात उडून गेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत सदर शाळेच्या नुकसानीचे शिक्षण विभागाकडून पंचनामे वा पाहणी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळेची दुरुस्ती तात्काळ करण्याची मागणी ग्रामस्थांनी जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शाळेच्या वर्गखाल्यांची दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय, गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, मानवत व कनिष्ठ अभियंता, समग्र शिक्षा, मानवत यांचे मार्फत चौकशी करण्यात आली असून शाळेच्या वर्ग खोल्यांची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे नमुद केले आहे. त्यानुसार राजमाता शैक्षणिक गुणवत्ता विकास अभियान अंतर्गत सदर शाळेतील वर्ग खोल्यांच्या दुरुस्तीसाठी रु.७.०० लक्ष निधी मंजुर आहे. सदरहु कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक १२-०६-२०२३ अन्वये देण्यात आलेले असून सदरचे काम अंतीम टप्यात आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यात जलजीवन मिशन अंतर्गत नळपाणी पुरवठा योजनांचा लाभ सर्व घटकांना मिळणेबाबत

**(१७) * ६४६८० श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: रायगड जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या जलजीवन मिशन अंतर्गत नळपाणी पुरवठा योजनांची बहुतांश कामे वन विभागाच्या हद्दीत येत असून त्यांच्याकडून ना-हरकत दाखला मिळत नसल्यामुळे अनेक गावे, वाडया-वस्त्या नळपाणीपुरवठा योजनेपासून वंचित राहणार असल्याचे माहे मे,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२ ) असल्यास, जलजीवन मिशन अंतर्गत नळपाणी पुरवठा योजनांची कामे मंजूर होऊन सुध्दा सुरू न झाल्यामुळे सदर योजनेचा लाभ वाडया वस्त्यांना मिळणार नसून शासनाचा निधीही अखर्चित राहणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून जलजीवन मिशन अंतर्गत नळपाणी पुरवठा योजनांचा लाभ तळागाळातील प्रत्येक घटकाला मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनामार्फतच्या जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत रायगड जिल्हयात जिल्हा परिषदेमार्फत एकूण १४२२ आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत एकूण ३१ योजना अशा एकूण १४५३ योजना राबविण्यात येत आहेत. त्यापैकी जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या ५४ योजना व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या ०२ योजना अशी एकूण ५६ योजनांची कामे वन विभागाच्या हद्दीत येतात. त्यापैकी ०४ कामांना वन विभागाची मंजूरी मिळाली आहे.

वन विभागाच्या हद्दीत येणाऱ्या पाणी पुरवठा योजनांच्या उपांगांच्या कामाबाबत वन विभागाकडून आवश्यक नाहरकत दाखले मिळविण्यासाठी वन विभागास प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. त्याचा पाठपुरावा करणे सुरु आहे.

वन विभागाची परवानगी प्रलंबित असलेल्या योजनांमध्ये, योजनांची वन विभागाच्या क्षेत्रातील उपांगाची कामे वगळता इतर कामे प्रगतीत आहेत. जी कामे पूर्णपणे वन विभागाच्या हद्दीत आहेत त्यांच्या परवानग्या तातडीने प्राप्त करुन घेण्यात येत आहेत.

(२) हे खरे नाही.

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत रायगड जिल्हयातील जिल्हा परिषद व महाराष्ट्र जीवन प्राधिरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या एकूण १४५३ योजनांची कामे प्रगतीपथावर आहे. योजनांची कामे विहीत मुदतीत पूर्ण करण्याचे नियोजन असल्यामुळे निधी अखर्चित राहण्याचा प्रश्न नाही. योजनांची कामे पुर्ण झाल्यानंतर पाणी पुरवठा योजनांचा लाभ सर्व घटकांना मिळणार आहे.

(३) वन विभागाच्या परवानगीसाठी वन विभागाकडे सादर करण्यात आलेले प्रस्ताव सत्वर निकाली काढणे अनुषंगाने संबंधति यंत्रणांबरोबर वेळोवेळी दूरदृश्य प्रणालीव्दारे बैठका घेवून राज्य तसेच केंद्र सचिव स्तरावरुन निर्देशित करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्ह्यात कार्यरत असलेले बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत**

**(१८) * ६६६३७ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात अनेक वाडया-वस्त्यांमध्ये बोगस वैद्यकीय प्रमाणपत्र घेवून अनेक डॉक्टर कार्यरत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा बोगस डॉक्टरांमुळे स्थानिक रहिवाश्यांचा आरोग्यासंदर्भात अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू बाब अनेक पत्रकारांनी स्थानिक आरोग्य अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रारी करुनही त्यांचेविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन बोगस डॉक्टर व संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :**(१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) पालघर जिल्हातील ग्रामीण क्षेत्रात २३ वैद्यकीय व्यवसायिक बोगस असल्याबाबत सन २०२० पासुन तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी चौकशी अंती एकूण ३ वैद्यकीय व्यावसायिकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**बल्लारपूर (जि. चंद्रपूर) तालुक्यात जलजीवन योजनेअंतर्गत १८ गावे मागील पाच वर्षापासून पाण्यापासून वंचित असल्याबाबत**

**(१९) * ६८९६३ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बल्लारपूर (जि. चंद्रपूर) तालुक्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या योजनेअंतर्गत १८ गावांच्या ग्रीड पाणी पुरवठा योजनेचे काम मागील अनेक वर्षापासून संथगतीने सुरू असल्याने अद्यापही सदर योजना पूर्ण न झाल्याने १८ गावातील जवळपास ८ हजार ८६६ कुटूंबांना पाण्यापासून वंचित राहावे लागत असल्याचे माहे जून, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजना दिलेल्या कालावधीत पुर्ण न झाल्याप्रकरणी शासनाने चौकशी करून संबधितावर कारवाई करुन सदर योजना तातडीने पुर्ण करून नागरिकांना पाणी उपलब्ध होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) व (२) बल्लारपूर तालुक्यातील (१८ गावे) ग्रीड पाणी पुरवठा योजनेची कामे ही ९०% पुर्ण झालेली आहेत. मात्र योजनेतील स्थापत्य कामाची गती संथ असल्यामुळे मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, नागपुर यांनी संबंधित कंत्राटदारास दि.१.१२.२०२० पासून रू.१०,५६२/- प्रतिदिन दंड लावला आहे.

(३) योजनेतील पाईपचा पुरवठा उशीरा होणे, कार्यक्रमाच्या निकषानुसार उद्भवाची कामे पुर्ण झाल्याशिवाय टप्पा-२ व टप्पा-३ ची कामे सुरू करता न येणे, चारवट व हडस्ती येथील टाक्यांची जागा ग्रामपंचायतीने उशिरा

उपलब्ध करून देणे, झोनल संतुलन टाकीकरीता खाजगी जागा आवश्यक असल्यामुळे ती जागा थेट वाटाघाटीद्वारे खरेदी करण्याकरीता भुमी अभिलेख, बल्लारपूर कार्यालयाद्वारे मोजणीची प्रक्रीया करून टाकीचे बांधकाम पूर्ण करण्यास विलंब होणे, जलशुध्दीकरण केंद्र ते झोनल संतुलन टाकी पर्यत टाकण्यात आलेल्या पाईपलाईन कळमना लावारी, येनबोडी या दरम्यानची राष्ट्रीय महामार्ग, गडचिरोली मार्फत मोडतोड झाल्यामुळे पाईपलाईनचे लिकेजेस दुरुस्ती करावे लागणे इत्यादी कामांमुळे विलंब झाला आहे.

-----------------

## विरार येथे भिंत कोसळून तीन कामगारांचा झालेला मृत्यू

**(२०) * ६४९८६ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार येथील मनवेल पाडा रस्त्यावरील सूर्यकिरण या इमारतीच्या पुर्नविकासचे काम करणाऱ्या कामगारांवर दिनांक ६ जून,२०२३ रोजी वा त्यासुमारास भिंत कोसळून झालेल्या अपघातात तीन महिला कामगारांचा जागीच मृत्यू झाला व एक कामगार गंभीर जखमी झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर दुर्घटनेतील मृत व जखमी कामगारांच्या परिवारास आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर अपघाताशी संबंधित बांधकाम कंत्राटदार, विकासक आणि वास्तु विशारद यांचेविरुद्ध भारतीय दंड संहिता १८६० अंतर्गत कलम ३०४, ३३७, ३३८ व ३४ अन्वये गुन्हा (FIR) क्र. ०५४५, दि. ०६.०६.२०२३ रोजी विरार पोलिस ठाणे, पालघर येथे गुन्हा दाखल केलेला आहे.

बांधकामाच्या ठिकाणी दि.०७.०६.२०२३ रोजी दिलेल्या तपासणी भेटीवरुन सदर बांधकामाची जागा ही कामगाराच्या जिवितास, सुरक्षेस व आरोग्यास धोकादायक असल्याचे दिसून आल्यामुळे, सरकारी कामगार अधिकारी, पालघर यांनी सदर बांधकामाच्या जागेवर धोक्याचे कारण दूर करण्यासाठी उपाययोजना करण्यात येईपर्यंत व सदर उपाययोजनेबाबत समाधान होईपर्यंत, महाराष्ट्र व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) नियम २००७ च्या नियम २६३ अन्वये दिनांक ०७.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये इमारतीच्या बांधकामास कामबंद/मनाई आदेश पारीत करण्यात आलेले आहेत.

सरकारी कामगार अधिकारी, पालघर यांचेमार्फत किमान वेतन अधिनियम १९४८ व इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ अंतर्गत मालक/कंत्राटदार यांचेविरुध्द खटले दाखल करण्याची कार्यवाही चालू आहे.

(३) मयत कामगाराच्या वारसदारांना अपघात नुकसान भरपाई देणेबाबत श्रमिक नुकसान भरपाई आयुक्त, मुंबई यांच्या कार्यालयास दिनांक ०७.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

तसेच मयत झालेल्या कामगारांच्या वारसास कर्मचारी नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ अंतर्गत नुकसान भरपाई देण्याबाबत बांधकाम विकासक व कंत्राटदारास दिनांक ०७.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात महात्मा ज्योतिराव फुले योजनेअंतर्गत रुग्णांना लाभ मिळणेबाबत

**(२१) * ६४९०७ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल असलेल्या रुग्णावर मोफत शस्त्रक्रियेसह उपचार मिळण्यासाठी राबविण्यात येणा-या महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेच्या लाभासाठी शासकीय व खाजगी रूग्णालय प्रशासनाकडून योग्य तो प्रतिसाद मिळत नसल्यामुळे नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे मे ,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, या योजनेअंतर्गत राज्यातील खाजगी रुग्णालयांनी रुग्णांकडून जादा शुल्क आकारल्याचेही माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, या योजनेअंतर्गत कुटुंबाच्या वार्षिक पॅकेजची मर्यादा दीड लाख वरून पाच लाख रुपये करण्याची घोषणा शासनाने माहे एप्रिल, २०२३ मध्ये केली असून प्रत्येक वर्षाला त्यातील २५ टक्के निधी शासनाला देण्याचे निर्देश शासनाने विविध रुग्णालयांना दिले असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त निर्णयामुळे रुग्णालयांकडून रुग्णांना देण्यात येणाऱ्या सेवांवर याचा परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) (अ) महात्मा ज्योतिराव फुले योजनेअंतर्गत कुटुंबाच्या वार्षिक पॅकेजची मर्यादा दीड वरून पाच लाख रुपये करण्याची घोषणा शासनाने माहे मार्च, २०२३ मध्ये केली आहे.

(ब) प्रत्येक वर्षाला त्यातील २५ टक्के निधी शासनाला देण्याचे निर्देश शासनाने विविध रुग्णालयांना दिले असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्याची बाब खरी नाही.

(४) वरील ३ (ब) प्रमाणे वस्तुस्थिती असल्यामुळे रुग्णालयांकडून रुग्णांना देण्यात येणाऱ्या सेवांवर याचा परिणाम होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई पुणे दृतगती महामार्गावरील खालापूर येथे अद्यावत रुग्णालय उभारणेबाबत

**(२२) * ६६६४२ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे दृतगती महामार्गावर खंडाळा खालापूर परिसरात मोठया प्रमाणात अपघात होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू परिसरात अपघातानंतर तातडीने उपचार मिळण्यासाठी जवळपास रुग्णालय नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खालापूर येथे अद्ययावत रुग्णालय तयार करण्याबाबत स्थानिकांनी वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

सद्यस्थितीत खालापूर तालुक्यात चौक येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यरत आहे. तसेच खालापुरतालुक्यात लाहोप व वावोशी येथे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित आहे.

(३) होय.

(४) व (५) रागयड जिल्हयातील खालापूर तालुक्याच्या मुख्यालयी ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय स्थापन करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली असून दिनांक ०४ मार्च, २०२२ च्या शासन निर्णयान्वये सदर रुग्णालयाच्या इमारत बांधकामाच्या अंदाजपत्रक व आराखडयास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील ग्रामपंचायतींना कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी डंपिंग ग्राउंड उपलब्ध करून देण्याबाबत

**(२३) * ६५१५५ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील ७१ ग्रामपंचायत हद्दीतील वाढते नागरिकरण लक्षात घेता कचऱ्याची विल्हेवाट करण्यासाठी डंपिंग ग्राऊंड उपलब्ध नसल्यामुळे मोठया प्रमाणात कचऱ्याची समस्या निर्माण होत असल्याचे माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील ७१ ग्रामपंचायतींपैकी १० ग्रामपंचायतींनी सिडको प्रशासन, वनविभाग, पंचायत समिती, एमआयडीसी व जिल्हाधिकारी कार्यालयांकडे डंपिंग ग्राउंडसाठी जागेची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्‌अनुषंगाने उक्त तालुक्यातील ७१ ग्रामपंचायतींना कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी डंपिंग ग्राऊंड उपलब्ध करुन देण्याबाबत किंवा कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याबाबत करावयाच्या उपयायोजनेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश महाजन :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

डंम्पिंग ग्राउंड उपलब्ध नसल्यामुळे इतरत्र टाकण्यात आलेला कचरा ग्रामपंचायतीकडून नियमितपणे उचलला जात असून स्वच्छतेची काळजी घेण्यात येते.

(२) होय, हे खरे आहे.

(३) स्वच्छ भारत मिशन अंतर्गत व १५ वा वित्त आयोग यामधून कंपोस्ट पीट, प्लास्टिक साठवण युनिट इ. द्वारे कचरा व्यवस्थापनाचे काम करण्यात येत आहे. पनवेल तालुक्यातील ७१ ग्रामपंचायतींमधील गावांमध्ये सांडपाणी घनकचरा व्यवस्थापनांतर्गत कामे करण्यात येत आहेत. तसेच अन्य काही ग्रामपंचायतींनी सिडको, वन विभाग, एमआयडीसी, जिल्हाधिकारी कार्यालयांकडे डंपिंग ग्राउंड करीता जागा मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**
**मुंबई.** **सचिव-१ (का.),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.